# प्रेम आणि मैत्री : अर्थराजकीय व्यवस्थेच्या विरोधातील नवी भाषा



हितेश पोतदार

अर्थबोध



अर्थकारण हे कुठल्या एका पोकळीत घडत नसते. या अर्थकारणातून स्फुरलेल्या व्यवहारांना सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक पैलूही जोडलेले असतात. किंबहुना, त्या त्या समूहात घडून येणाऱ्या अर्थकारणातून सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय हितसंबंधांची जोपासना होत असते. अर्थातच या परस्पर व्यवहाराला स्वतःचा असा मानवी चेहरा असतो. अर्थजंजाळात हरवून जाणाऱ्या याच मानवी चेहऱ्याचा शोध घेणारी, अर्थराजकारणाला धग देणाऱ्या घटितांचा अन्वयार्थ उलगडणारी ही लेखमाला...

प्रेम आणि मैत्री ही नाती सहज निर्माण होणारी वाटली, तरी ती नेहमीच एका मोठ्या संघर्षाच्या अवकाशात आकार घेत असतात. ही नाती केवळ भावनिक ओढींच्या आणि निवडींच्या पातळीवर थांबत नाहीत; ती व्यवस्थेच्या अस्थिरतेला आव्हान देतात, त्यात विसंगती निर्माण करतात. या अस्थिरतेचा गैरफायदा घेत समाज स्वतःची चौकट अधिक बळकट करत राहतो.

जिथे जिथे अशी नाती व्यवस्थेच्या चौकटींना छेद देण्याचा प्रयत्न करतात, तिथे अस्थिरता निर्माण होते. पण हीच अस्थिरता व्यवस्थेतील विसंगती उघड करते आणि प्रतिकाराच्या शक्यता निर्माण करते. या लेखात प्रेम आणि मैत्रीच्या नाजूक रचनेचा, तिच्या सामाजिक आणि राजकीय संदर्भांतील अर्थाचा शोध घेतला आहे. अशा वेळी प्रेम आणि मैत्री या एक राजकीय कृती ठरतात – त्या प्रतिकाराची भाषा बोलतात, पण त्या प्रतिकाराच्या मुळाशी व्यवस्थेच्या असमानतांचा खोलवर अभ्यास असतो.

**मैत्री एक संस्था**

काही दिवसांपूर्वी 'टाटा सामाजिक विज्ञान संस्थान'च्या तुळजापूर येथील ग्रामीण कॅम्पस मधील बी.ए.च्या वर्गात 'इन्स्टिटट्यूशन्स'बद्दल शिकवत असताना विद्यार्थ्यांच्या गटबांधणीचे ठळक स्वरूप लक्षात आले. पेहराव, भाषा, आणि वर्तनातील साम्यांच्या निरीक्षणातून स्पष्ट झाले की, मैत्री हीदेखील एक प्रकारची 'इन्स्टिटट्यूशन' आहे – सामाजिक, आर्थिक, आणि राजकीय पद्धतींनी विणलेला एक अवकाश.

विद्यार्थ्यांच्या गटांवर विशिष्ट वर्ग, प्रांत, आणि जात यांचा प्रभाव स्पष्ट दिसत होता. काही गट शहरी उच्चभ्रू आणि इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असलेले होते, तर काही गट झारखंड–छत्तीसगडसारख्या आदिवासी भागांतून आलेले होते. मराठी दलित विद्यार्थी, उत्तर भारतीय, आणि दक्षिण भारतीय विद्यार्थ्यांचे स्वतंत्र उपगट तयार झाले होते. निवासी कॅम्पसच्या दैनंदिन परस्परसंवादातून या गटांनी मैत्रीच्या ठळक चौकटी तयार केल्या.

वर्गातील चर्चेदरम्यान सहज बोलून गेलो, मैत्रीही एक 'इन्स्टिटट्यूशन' आहे. इतर सामाजिक संस्था जशा राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक स्वरूप धारण करतात, तशीच मैत्रीचीही रचना असते. सामाजिक अवकाशात आपण पहिल्या संवादाची निवड भौतिक आणि सामाजिक साम्यतेवर आधारित व्यक्तींशी करतो. 'मोस्ट फिट' व्यक्तीला निवडून तिच्याशी पहिले संभाषण होते. अशा निवडींमध्ये वर्ग, जात, आणि सांस्कृतिक पूर्वग्रहांचे प्रतिबिंब असते.

हे नाते जरी वरकरणी सहजस्वाभाविक वाटत असले, तरी तेही एका इन्स्टिटट्यूशनसारखे कार्य करते. संवादातून अलिखित नियम तयार होतात, परस्पर मर्यादा आखल्या जातात, त्यातून मैत्री किंवा प्रेमाचा प्रवास घडतो. जरी हे नियम अलिखित असले तरी सतत घडणाऱ्या संवादांमधून त्यांची चौकट स्पष्ट होत राहते.

खरं तर, मैत्री आणि प्रेम या नुसत्या भावनिक संकल्पना नसून, त्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय व्यवस्थांच्या प्रभावाखाली घडत असतात. आपल्या भौतिक, सांस्कृतिक, आणि राजकीय परिस्थितीशी त्यांचा संबंध असतो. त्यामुळेच या नात्यांची गती, स्वरूप, आणि दिशा समजून घेण्यासाठी त्या परिस्थितींच्या संदर्भात त्यांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**वर्गीय आणि जातीय वर्चस्वाचा परीघ**

या नात्यांचा अभ्यास करताना कलाविश्वाचे योगदान विचारात घेणे अपरिहार्य आहे. प्रेम आणि मैत्री या विषयांवर आधारित काव्य, कादंबऱ्या, आणि लघुकथा या साहित्यप्रकारांनी खूप काही मांडले आहे. मला या विषयावर लिहिण्यास भाग पाडणाऱ्या सुधीर बेडेकरांच्या 'प्रेम आणि द्वेष' या लघु–लेखाचा उल्लेख केल्याशिवाय पुढे सरकता येत नाही. त्यांची मांडणी मनातल्या तात्त्विक विचारांना प्रत्यक्ष अनुभवाचा आधार देते.

मात्र, साहित्यातील विशाल समृद्धतेकडे पाहता, सिनेमा हे माध्यम म्हणून निवडणे अधिक तात्कालिक आणि सुलभ ठरते. येथे मी इतर अनेक संबंधित चित्रपटांपैकी फक्त काहीचा विचार करणार आहे. मैत्री आणि प्रेमाला चित्रपटांतून समजून घेण्याची माझी सुरुवात श्याम बेनेगलांच्या 'सूरज का सातवा घोडा' पासून होते. या चित्रपटात त्याचा कथाकार माणेक (रजित कपूर) हा त्याचा मित्र श्याम याला (रघुवीर यादव) सांगतो, 'प्रेम सुद्धा एक वर्ग–संघर्ष आहे. आणि त्याचा उद्देश सामाजिक पुनरुत्थान हा आहे.' या वाक्याने मला प्रेमाविषयी व्यवस्थात्मक चौकटीतून विचार करण्यास उद्युक्त केले.

उदाहरणार्थ, 'सैराट' हा चित्रपट प्रेमाच्या युटोपियन स्वप्नांचा आणि जातीय असमानतेचा संघर्ष एकत्र उभा करतो. आर्ची–परशाचे प्रेम त्यांच्या आर्थिक आणि जातीय बंधनांना

**बेल हुक्स या गृहीतकाला आव्हान देत म्हणते की, आपल्याला व्यवस्थात्मक बंधने ओळखल्याशिवाय, प्रेमाच्या स्वप्नाची सत्यता जाणवत नाही. भांडवलशाहीने प्रेमाला वस्तुरूप (commodification) दिले आहे; भावनांच्या जागी आर्थिक व्यवहार बसवले आहेत. ही नाती केवळ भावनात्मक पातळीवर टिकत नाहीत; ती या ताणांमधून स्वत:ला नव्याने परिभाषित करतात. बेल हुक्स म्हणते, प्रेम ही एक राजकीय कृती आहे, जिथे आपण वर्चस्वाच्या संस्कृतीला नकार देतो...**

छेद देणारे असते. मात्र, त्यांच्या प्रेमाची अखेर त्यांच्या वर्ग आणि जातीय ओळखीमुळे होते. त्यांच्या नात्यात वर्ग आणि जात यांचा सतत संघर्ष दिसतो. जेव्हा आर्ची परशासाठी तिच्या सामाजिक-आर्थिक सुरक्षा सोडते, तेव्हा ती तिच्या वर्गीय आणि जातीय वर्चस्वाला झिडकारते. मात्र, समाज त्यांच्या नात्याला 'धोकादायक' मानतो आणि त्याचा परिणाम हिंसेत होतो.

त्याचप्रमाणे, दो बीघा जमीन वर्ग आणि लिंग यांच्या संघर्षाचे प्रतीक आहे. शंभू महातो आणि त्याच्या पत्नीचे नाते आर्थिक असमानतेमुळे ताणले गेले आहे. येथे स्त्रीला केवळ 'गृहिणी' म्हणून पाहिले जात नाही; ती कुटुंबाच्या अस्तित्वासाठी श्रमिक बनते. मात्र लिंगाच्या चौकटींमुळे तिच्या श्रमाला दुर्लक्षित केले जाते, तर वर्गीय/आर्थिक परिस्थिती तिचे स्थान अधिक दुबळे करते.

आकी कौरिसमाकीचे चित्रपट, जसे फलन लिव्हज्, द मॅच फॅक्टरी गर्ल आणि ड्रिफ्टिंग क्लाउड्स वर्गीय असमानतेचे नात्यांवर होणारे परिणाम दाखवतात. कौरिसमाकीच्या चित्रपटांना एक विशिष्ट सौंदर्यशास्त्र आहे - साधेपणा, संवादातील मोजकी शब्दयोजना, आणि दृश्यांमधून प्रकट होणारे सूचक अर्थ.

त्याच्या फॉलन लिव्हज या चित्रपटात प्रेम आणि नात्यांचा संघर्ष वर्गीय असमानतेच्या पाशात गुंतलेला आहे. हा संघर्ष भौतिक अस्तित्वासाठीच्या लढाईसोबत एका सूक्ष्म, परंतु तात्त्विक पातळीवर उलगडतो. फॉलन लिव्हज दोन साध्या व्यक्तींची कथा सांगतो - अनसा आणि होला, जे फिनलंडच्या कामगार वर्गात वावरत आहेत. कौरिसमाकी इथे प्रेमाला एका संघर्षमय प्रक्रियेचा भाग म्हणून दाखवतो. वर्गीय असमानता, बेरोजगारी, आणि भौतिक सुरक्षिततेचा अभाव नात्यांना स्थिर होऊ देत नाही.

आयरीन, द मॅच फॅक्टरी गर्ल ची नायिका, तिच्या कामाच्या ठिकाणी शोषण सोसते, तिच्या वैयक्तिक नात्यांमध्ये ती फसवली जाते. तिच्या वर्गीय स्थितीमुळे तिच्या जीवनातील प्रेम आणि मैत्रीवर सतत नियंत्रण ठेवले जाते. प्रेम इथे एक भावना म्हणून नव्हे, तर एक भौतिक लढा म्हणून समोर येते. ड्रिफ्टिंग क्लाउड्समध्ये बेरोजगारीमुळे एका जोडप्याच्या नात्यातील संघर्ष वाढतो. बेरोजगारी केवळ आर्थिक नाही, तर भावनिक स्तरावरही नात्यांना तोडते.


वर्ग, जात, आणि लिंग यांचे जाळे नात्यांच्या स्वरूपावर निर्णायक प्रभाव टाकते. उच्चभ्रू गटांसाठी नाती साधन-संपत्ती आणि सामाजिक मान्यतेच्या सुरक्षिततेत टिकतात, तर कामगार वर्ग किंवा जातीयदृष्ट्या शोषित गटांसाठी ती अस्तित्वासाठीची लढाई ठरतात.

जिथे 'सैराट' प्रेमाला जातीय चौकटींना विरोध म्हणून उभे करते, तिथे 'प्यासा' आणि 'दो बीघा जमीन' आर्थिक असमानतेच्या चौकटीत प्रेमाचा अभ्यास करतात. 'रुदाली' आणि 'द मॅच फॅक्टरी गर्ल' हे चित्रपट स्त्रियांच्या अनुभवांमधून वर्ग, जात आणि लिंग यांच्या ताणाचा वेध घेतात.

या चित्रपटांमधील नात्यांचे संदेश स्पष्ट करतात की, प्रेम आणि मैत्री या केवळ अलिप्त भावना नसून, त्या समाजाच्या संस्थात्मक संरचनेचा भाग आहेत. पुढील तात्त्विक भागात आपण या नात्यांच्या वर्ग, जात, आणि लिंगाशी संवाद साधणाऱ्या स्वरूपाचा सखोल विचार करू. या नात्यांचे तत्त्वज्ञान, त्यांची भौतिक चौकट, आणि त्यामधील असमानतेच्या बंधनांमधून नवी दिशा शोधण्याचा प्रयत्न करणेही इथे आवश्यक ठरेल.

### प्रेम आणि मैत्रीचे समाजविज्ञान

आपल्या जीवनातील प्रेम आणि मैत्री ही केवळ भावनिक अभिव्यक्ती नाहीत. मैत्री, जी बहुतेकवेळा स्वतंत्र आणि नैसर्गिक वाटते, प्रत्यक्षात भौतिक परिस्थितीशी बांधलेली आहे. आपण जेव्हा म्हणतो की मैत्री सुद्धा एक प्रकारची इन्स्टिट्यूशन आहे, तेव्हा या विधानामागे एक विस्तृत तात्त्विक विचार उभा राहतो. ज्यावेळेस आपण प्रेम आणि मैत्रीला अलिप्तरित्या, स्वतंत्रपणे बघतो तेव्हा त्याविषयीची अशी तात्त्विक बैठक उभी करणे अवघड होते. कारण, तिला



*प्रेम आणि मैत्री या मानवी जगण्यातल्या दोन उदात्त भावनांचा बाजार मांडत भांडवलशाही व्यवस्था त्यावर सर्रास नियंत्रण राखू पाहते...*

व्यक्तिनिष्ठ स्वरूप प्राप्त होते. परिणामी या संकल्पना क्लिष्ट होतात. परंतु, या संकल्पना सामाजिक विज्ञानाच्या चौकटीत ठेवून आणि त्यांना त्यातील विश्लेषणाच्या वैज्ञानिक पद्धती लागू करून त्यांचा आवाका आटोक्यात आणता येतो.

संभाषण हे कुठलीही भौतिक आणि भावनिक नाते निर्मिती प्रक्रियेचा पहिला टप्पा आहे. तुम्ही पहिल्या संभाषणाला कुठल्या आधारावर सुरुवात करता? अमेरिकी स्त्रीवादी लेखिका ग्लोरिया जीन वॅटकिन्स ऊर्फ बेल हुक्स म्हणते, समानता आणि ओळख हे प्रेमाच्या आणि मैत्रीच्या निवडीचे पहिले नियम आहेत. परंतु, पितृसत्ताक व्यवस्था, आर्थिक वर्चस्व, आणि जातीय चौकटी आपल्या नात्यांची वाटचाल ठरवतात. आपण निवडतो, पण ती निवड व्यवस्थेच्या चौकटीत बांधलेली असते. म्हणजे प्रेम आणि मैत्री बहुतांश रित्या आपल्याच जातीत, वर्गात आणि इतर अवकाशात होतात.

पहिले संभाषण फार सोयीचे असते. आपले हेतू, आपले पूर्वग्रह आपली पहिली निवड ठरवतात आणि संभाषण सुरू होते. त्यामुळे 'लव ॲट फर्स्ट साइट' वैगेरे भ्रामक संकल्पना आहे. ही सोयीची चौकट ओलांडून हे संभाषण सुरू झाल्यास त्यातून नाते निर्मिती करणे अवघड होते. कारण अनेक सामाजिक-आर्थिक-राजकीय शक्ती ते थांबवण्यासाठी सदैव कार्यरत असतात. जे वरील चित्रपटांच्या कथानकांवरून आपल्याला दिसतेच.

जर्मन तत्त्वज्ञ अर्न्स्ट ब्लॉख आपल्याला सांगतो, प्रेम हे भविष्याचा शोध आहे,. त्याच्या मते, प्रेम आणि मैत्री ही आपल्या जीवनात 'Not-Yet-Become' म्हणजे अजून घडायचे राहिलेले भविष्याचे स्वप्न असते. ती भावना केवळ वर्तमानाची भौतिक चौकट ओलांडून जाण्याचा प्रयत्न करते. मात्र, बेल हुक्स या गृहीतकाला आव्हान देत म्हणते की, आपल्याला व्यवस्थात्मक बंधने ओळखल्याशिवाय, प्रेमाच्या स्वप्नाची सत्यता जाणवत नाही. भांडवलशाहीने प्रेमाला वस्तुरूप (commodification) दिले आहे; भावनांच्या जागी आर्थिक व्यवहार बसवले आहेत. ही नाती केवळ भावनात्मक पातळीवर टिकत नाहीत; ती या ताणांमधून स्वतःला नव्याने परिभाषित करतात. बेल हुक्स म्हणते, प्रेम ही एक राजकीय कृती आहे, जिथे आपण वर्चस्वाच्या संस्कृतीला नकार देतो.

फ्रेंच तत्त्वज्ञ ॲलन बडीयू म्हणतो, प्रेम आणि मैत्री म्हणजे नवीन सत्याचा शोध आहे. पण हा शोध आजच्या व्यवस्थेमध्ये जोखीममुक्त बनवला गेला आहे. भांडवलशाहीने डेटिंग ॲप्सच्या रूपात नात्यांचे 'सुरक्षित' मॉडेल दिले आहे, जिथे तुमचे सर्व जोखमीचे निर्णय अल्गोरिदमवर आधारित असतात. मात्र, हे नात्यांचे वास्तविक सत्य हरवते. बडीयूची चिंता इथे समर्पक ठरते: जोखीमशून्य नाती प्रेमाचा आत्मा हरवून बसतात.

परंतु, पोलिश-ब्रिटिश समाजअभ्यासक, तत्त्वज्ञ झिग्मंट बाउमन याचा या मताशी वेगळा सूर आहे. त्याच्या मते, आधुनिक भांडवलशाहीने प्रेमाला जोखीममुक्त बनवले आहे, जिथे नाती ही फक्त तात्कालिक समाधानासाठी किंवा व्यक्तिगत फायद्यासाठी निर्माण होतात. याला बडीयू स्पष्ट विरोध करतो, कारण जोखीमशून्य नाती ही खऱ्या अर्थाने सत्य शोधण्याची क्षमता हरवून बसतात.

हा तात्त्विक वाद खऱ्या जीवनातील नात्यांमध्ये सतत दिसून



*'दो बिघा जमीन', 'सैराट' आणि 'सूरज का सातवा घोडा' हे चित्रपट वर्गीय, जातीय संघर्षातून आकारास येणाऱ्या नात्यांचा, समाजाच्या संस्थात्मक संरचनेचा भाग असलेल्या प्रेम आणि मैत्रीचा माग काढतात...*

येतो. जातीय आणि वर्गीय व्यवस्थेमुळे, नाती केवळ सामाजिक चौकटींमध्ये बंदिस्त होत नाहीत, तर ती त्या चौकटींना आव्हान देण्यासाठी एक राजकीय कृती बनतात. जर्मन-अमेरिकन इतिहास तत्त्वज्ञ हन्ना अरेंडचा द ह्यूमन कंडिशन हा ग्रंथ याबाबत महत्त्वपूर्ण आहे. ती म्हणते की, मैत्री ही खासगी नाती असली तरी ती सार्वजनिक संवादासाठीचे साधन बनते. अरेंडच्या या मांडणीतून मैत्रीला एका राजकीय कृतीचे स्वरूप मिळते, जिथे ती सामाजिक वर्चस्वाला आव्हान देते.

**प्रेम आणि मैत्री : रचना आणि संघर्ष**

प्रेम आणि मैत्री यांसारख्या नात्यांची सहजतेने भावनिक किंवा वैयक्तिक म्हणून केलेली व्याख्या त्यांच्या मुळात असलेल्या सामाजिक, आर्थिक, आणि राजकीय चौकटींना दुर्लक्षित करते. स्टुअर्ट हॉल आणि रेमंड विल्यम्स यांचे विचार ओढून-ताणून (ज्याला अय्याज मालिक व स्टीफन कीपर म्हणतात- stretching and translating) या नात्यांना समजण्याचा प्रयत्न केल्यास एका वेगळ्या पातळीवर नेऊन ठेवतात - जिथे भावना केवळ वैयक्तिकतेचे क्षेत्र राहात नाहीत, तर त्या भूतकाळ, वर्तमान आणि भविष्याच्या सामाजिक प्रक्रियांशी जोडल्या जातात. हॉल आणि विल्यम्स यांच्या तात्त्विक मांडण्या या नात्यांच्या रचनेचा आणि त्यामागील संघर्षांचा अधिक सखोल वेध घेण्यास मदत करतात.

स्टुअर्ट हॉल म्हणतो की, वर्तमान बदलायचे असेल, तर आधी त्याला जन्म देणारा भूतकाळ समजून घ्यायला हवा. या विधानातून तो एका गोष्टीवर जोर देतो - आपण ज्या क्षणांमध्ये जगतो, ज्या नात्यांमध्ये वावरतो, त्या केवळ त्या क्षणापुरत्या नसतात; त्या इतिहासाच्या अनेक स्तरांतून आकार घेत असतात. प्रेम आणि मैत्री सुद्धा. मैत्री हा एक सहजस्वाभाविक भावनिक अनुभव वाटू शकतो, परंतु ती नेहमीच समान वर्ग, जात किंवा लिंगाच्या चौकटींमध्ये अधिक सोयीस्करपणे आकार घेत असल्याचे आपण पाहतो. वर्गमित्रांमधील सहज ओढ, जातीय साम्यांमधून तयार होणारी जवळीक, किंवा समान लिंगाधारित भूमिकांमधील संवाद यामागे एखाद्या व्यक्तीच्या व्यक्तिगत निवडींपेक्षा इतिहासाने आखून दिलेल्या चौकटी कार्यरत असतात. हॉलच्या विचारांमुळे हे उलगडते की, या क्षणांना समजण्यासाठी त्यांच्या इतिहासाचा मागोवा घ्यावा लागतो. जातीय किंवा वर्गीय पायाभूत व्यवस्थांनी मैत्रीचे आणि प्रेमाचे स्वरूप कसे घडवले आहे, याचा विचार केल्याशिवाय आपण या नात्यांचा गाभा समजू शकत नाही.

इथे रेमंड विल्यम्सचा 'स्ट्रक्चर ऑफ फीलिंग' या संकल्पनेचा संदर्भ महत्त्वाचा ठरतो. विल्यम्स सांगतो की, प्रत्येक काळाच्या सामाजिक चौकटींमध्ये काही भावना आणि अनुभव असे असतात जे सिस्टिममध्ये व्यवस्थित रचलेले नसतात, परंतु ती 'जिवंत जाणीव' (किंवा lived experiences) म्हणून सतत कार्यरत असतात. हीच जाणीव नात्यांच्या संदर्भात अधिक ठळकपणे जाणवते. उदाहरणार्थ, एका उच्चभ्रू व्यक्तीचे एखाद्या कामगार वर्गातील व्यक्तीशी असलेले नाते किंवा दोन भिन्न जातीय व्यक्तींचे नाते यामध्ये एक प्रकारची अस्वस्थता जाणवते. ही अस्वस्थता विल्यम्सच्या मते स्ट्रक्चर ऑफ फीलिंगमध्ये आहे - ती व्यवस्थेने स्पष्टपणे परिभाषित केलेली नाही, पण ती सतत नात्यांमध्ये प्रकट होते.

हॉल आणि विल्यम्स यांच्या विचारांचा एकत्रित वेध घेतल्यास, हे स्पष्ट होते की प्रेम आणि मैत्री केवळ इतिहासाने घडवलेल्या चौकटींचे परिणाम नसून, त्या चौकटींमधील विसंगतींमधूनही आकार घेतात. उदाहरणार्थ, 'सैराट'मधील आर्ची आणि परशाचे नाते केवळ जातीय व्यवस्थेच्या विरोधात

उभे नाही, तर ते त्या व्यवस्थेमधील विसंगतीचे द्योतक आहे. जातीय वर्चस्व आणि आर्थिक असमानता यांच्या पाशातही प्रेम उगम पावते, परंतु हे प्रेम एका वेगळ्या 'स्ट्रक्चर ऑफ फीलिंग'चे उदाहरण आहे – जिथे भूतकाळ आणि वर्तमान एकत्र येऊन भविष्यासाठी प्रतिकाराची शक्यता तयार करतात.

विल्यम्सच्या दृष्टीने, ही विसंगती व्यवस्थेला प्रत्यक्ष आव्हान देण्यापेक्षा अधिक सूक्ष्म असते. ती व्यवस्थेच्या दरम्यान उभी राहते – जिथे व्यक्तीची वैयक्तिक जाणीव आणि व्यवस्थेची बंधने यांचा संघर्ष सुरू होतो. यामुळे, प्रेम आणि मैत्री केवळ सामाजिक चौकटींमधून आकार घेत नाहीत, तर त्या चौकटींना प्रतिकार करण्यासाठीचे अवकाश देखील तयार करतात. हॉलच्या मते, हीच विसंगती इतिहासाच्या वर्तमानात प्रकट होण्याची प्रक्रिया आहे.

प्रेम आणि मैत्रीच्या नात्यांना एका व्यापक सामाजिक चौकटीत बघताना हॉल आणि विल्यम्स यांचे विचार एक महत्त्वाचा प्रश्न विचारतात – नाती व्यवस्थात्मक चौकटींमध्ये अडकलेली असली तरी त्यांना त्या चौकटींना बदलण्याची क्षमता आहे का? हॉलचा इतिहासावर आधारित दृष्टिकोन सांगतो की, कोणतीही वर्तमान परिस्थिती अपरिहार्य नाही; ती भूतकाळाच्या प्रक्रियांमधून आली आहे, आणि त्यामुळे ती बदलता येण्यासारखी आहे. त्याचवेळी, विल्यम्सचे 'स्ट्रक्चर ऑफ फीलिंग' सांगते की, व्यवस्थेच्या विरोधातील भावना सतत कार्यरत असतात, जरी त्या स्पष्टपणे ओळखता येत नसल्या तरी.

जर आपण प्रेम आणि मैत्रीला या चौकटीतून पाहिले, तर त्या केवळ वैयक्तिक भावना राहत नाहीत. ते इतिहासाने घडवलेले, वर्तमानात अडकलेले, आणि भविष्याच्या शक्यता तयार करणारे भावघटक ठरतात. हॉल आणि विल्यम्स यांच्या विचारांचा संवाद आपल्याला दाखवतो की, नाती केवळ सामाजिक चौकटींशी जुळवून घेण्याची प्रक्रिया नाहीत; ती त्या चौकटींच्या विसंगतीतून नवीन काही निर्माण करण्याची शक्यता देखील आहेत. परिणामी, प्रेम आणि मैत्री केवळ व्यक्तिगत अनुभव नाहीत, तर त्या व्यवस्थात्मक असमानता, विसंगती, आणि प्रतिकाराच्या जागा आहेत, जिथे भूतकाळ, वर्तमान, आणि भविष्याचा एक अविभाज्य प्रवाह तयार होतो.

या व्यवस्थेतून बाहेर पडण्याचा मार्ग हुक्स, हॉल, ब्लॉखकडे आहे का? जो आपल्याला भविष्याचा शोध सुचवतो, पण त्यासाठी वर्तमानाची व्यवस्था समजून घेण्याची गरज आहे. यासाठी हॉल आणि हुक्सचा दृष्टिकोन उपयुक्त ठरतो. हुक्स म्हणते की, प्रेम ही क्रांतिकारक कृती आहे. म्हणजेच, नात्यांमध्ये भौतिक बंधनांवर विजय मिळवणे हा पहिला टप्पा आहे. दो बिघा जमीन मधील शंभू आणि त्याच्या पत्नीचे नाते आर्थिक परिस्थितीच्या दडपणाखाली असते, पण त्यातील एकमेकांवरील विश्वास त्यांना संघर्षासाठी उभं करतो.

तसे पाहता, मैत्री आणि प्रेम यांचा अभ्यास म्हणजे सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेच्या मुळांचा शोध आहे. त्यांचे स्वरूप व्यवस्थात्मक बंधनांमध्ये अडकलेले असले तरी, त्यातून प्रतिकाराची क्षमता तयार होते. प्रेम आणि मैत्री ही नाती व्यवस्थात्मक चौकटींमध्ये अडकलेली असली तरी, ती व्यवस्थेच्या विरोधातील कृती ठरतात.

ब्लॉख ज्या भविष्यातील आशेचा विचार करतो, हुक्स ज्या प्रतिकाराची कृती मानते, आणि विल्यम्स ज्या वर्तमानातील जिवंत विसंगती सांगतो – हे सगळे विचार एकत्र घेतल्यास, नाती ही केवळ आनंद किंवा दुःखाच्या व्याख्यांमध्ये अडकून राहत नाहीत; ती व्यवस्थेला ओलांडून नवीन जग निर्माण करण्याच्या शक्यतांचा अवकाश होतात.

अशा पद्धतीने प्रेम आणि मैत्री ही केवळ वैयक्तिक भावना नाहीत, तर त्या व्यवस्थेच्या विरोधातील एक जाणीवपूर्वक कृती ठरतात – एक प्रतिकार, जो इतिहासाला ओलांडत भविष्याला नव्या दिशेने घेऊन जातो.

---

**या लेखात उल्लेखलेल्या दिग्दर्शक श्याम बेनेगल यांचे डिसेंबर महिन्यात निधन झाले. समाजातील स्थित्यंतराचे चित्रपटांच्या माध्यमातून दस्तावेजीकरण करणाऱ्या बेनेगलांच्या कार्यकर्तृत्वाचा मागोवा घेणे काही अपरिहार्य कारणांमुळे या अंकात साधता आले नाही. त्याबद्दल दिलगीर आहोत– संपादक**

**(लेखक किंग्ज कॉलेज, लंडन येथील डिपार्टमेंट ऑफ इंटरनॅशनल डेव्हलपमेंट आणि डिपार्टमेंट ऑफ जिऑलॉजीशी संलग्न पीएच.डी. अभ्यासक आहेत. संपर्क**: hitesh.potdarkcl.ac.uk)